# बृहन्मुंबई महानगरपालिका

**लोकमान्य टिळक महानगरपालिक सर्वसाधारण रुग्णालय, शीव, मुंबई – २२**

लोटिरु /21326/ना.आ.कें.धा **दिनांक:** 29.08.2023

**जाहिरात**

लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालयात डायलिसीस तंत्रज्ञाची ६ पदे कंत्राटी पध्दतीने एका वेळी सहा महिन्यांपर्यंत व कमाल एक वर्षाकरीता भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर पदासाठी रुपये २९१+१८% जीएसटी रु. ५२/- = एकूण रु. ३४४/- इतके शुल्क लो.टि.म.स. रुग्णालयाच्या रोखपाल विभागात दि.31/08/2023 पासून कार्यालयीन वेळेत (शनिवार तसेच रविवार व सार्वजनिक सुट्टी वगळून) सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यत भरून, त्याची पावती अर्जासोबत जोडून अर्ज लो.टि.म.स.रुग्णालयाच्या आवक/जावक विभागात दि.11/09/2023 पर्यंत सादर करावा. (दूरध्वनी क्र.०२२ २४०७६३८१/२४०६३०००).

**पदाचे नाव:** ‘‘डायलिसीस तंत्रज्ञ – ठोक रक्कम रु. २०,०००/- दरमहा मानधनाकरिता.

**शैक्षणिक अर्हता –**

**१.** उमेदवार बी.एस्सी व बीपीएमटी परीक्षा उत्तीर्ण असावा.
**२.** संबंधित कामाचा ३ ते ५ वर्ष अनुभव असणे संयुक्तिक.
**३.** वयोमर्यादा – ३८ वर्षे – खुला वर्ग, ४३ वर्षे– राखीव प्रवर्ग
**४.** मराठी व इंग्रजीचे लेखी व तोंडी ज्ञान असणे आवश्यक.
**५.** ही नेमणूक केवळ तात्पुरत्या स्वरुपात असेल व उमेदवारास कोणत्याही प्रकारे नियमित कायम स्वरुपी नोकरीवर हक्क सांगता येणार नाही.
**६.** रु.२०००० प्रति माह ठोक वेतन मिळेल.

**सर्वसाधारण अटी व शर्ती :**

१. कंत्राटी ‘‘डायलिसीस तंत्रज्ञ’’ यांना दरमहा एकूण रु.२०००० प्रति माह ठोक वेतन मिळेल. या वेतना व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा महागाई भत्ता, घरभाडे भत्ता इत्यादी अनुज्ञेय असणार नाही.
२. उपरोक्त पदांची कंत्राट तत्वावर नियुक्ति एका वेळी सहा महिन्यापर्यंत व कमाल एक वर्ष करीता अशा प्रकारे करण्यात येईल.
३. त्यांच्या सेवेच्या कालावधीमध्ये त्यांची सेवा दर २९ दिवसापूर्वी एक दिवस खंडीत करण्यात येईल.
४. सदर उमेदवारांना रुग्णालयात आवश्यकतेनुसार तिन्ही पाळीमध्ये चक्रांकित पध्दतीने काम करावे लागेल.

५. उमेदवारास नियुक्त केलेल्या विभागातील सत्रांनुसार साप्ताहिक रजा व परिपत्रक क्र. संचालक/वै.शि.प्र.रु./3644 दि. 14.10.2022 अन्वये मंजुर केलेल्या 15 नैमित्तिक रजा अनुज्ञेय असेल त्या व्यतिरिक्त इतर कोणतीही रजा अनुज्ञेय नाही.

६. कंत्राटी कालावधीत त्यांचे काम समाधानकारक न आढळल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता सेवा समाप्त केली जाईल.

७. त्यांची नेमणूक करार पध्दतीची असल्यामुळे त्यांना कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.

८. बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा नियमावली नुसार ही नेमणूक झाली नसल्यामुळे त्या अनुषंगाने मिळणारे निवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास ते पात्र राहणार नाहीत.

९. त्यांची नियुक्ती पोलीस ना हरकत प्रमाण पत्र नियुक्ती दिनांका पासुन १५ दिवसांच्या आत सादर करण्यासापेक्ष करण्यात येईल.

१०. नियुक्तीचे वेळी उमेदवाराकडुन रु.१००/- बॉंड पेपर वर करारनामा करुन घेण्यात येईल.

११. ते दररोज नियमाने हजेरी पटावर त्यांच्या कर्तव्याच्या वेळेनुसार स्वाक्षरी करतील अन्यथा त्यांना गैरहजर धरण्यात येईल. त्यांची विना परवानगी गैरहजेरी विनावेतनी गैरहजेरी करण्यात येईल.

१२. जाहिरात देऊन अर्ज मागवून अर्हता पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील. निवड झालेल्या उमेदवारांमधून सहा उमेदवारांच्या नेमणूका करून आणखीन तीन उमेदवार प्रतिक्षायादी वर ठेवण्यात येतील. एक वर्षाच्या कालावधीत नेमलेल्या ६ उमेदवारांपैकी कोणीही सेवा सोडून गेल्यास प्रतिक्षायादीतील उमेदवारांमधून नेमणूका करण्यात येतील.

१३. सदर पदासाठी ५० पेक्षा अधिक पात्र उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाल्यास केवळ प्रथम २५ पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल.

१४. **वयोमर्यादा:** ३८ वर्षे - खुला वर्ग, ४३ वर्षे- राखीव प्रवर्ग .

**सही/-29.08.2023**

**डॉ. मोहन जोशी**

**अधिष्ठाता**

**लोटिमवैम व लोटिमस रुग्णालय,**

**शीव, मुंबई ४०० ०२२**